ePaper
# पंढरी सजली..; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज शासकीय महापूजा

वर्ष - 7 । अंक -60 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त सर्व भाविकांना शुभेच्छा!

www.mahaenews.com | ।शुक्रवार, दिनांक 29 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मिळकतकर भरला का?

## » पिंपरी-चिंचवडकर त्वरा करा : सवलतीसाठी उरले शेवटचे दोनच दिवस

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बकरी ईद आणि आषाढी एकादशीनिमित्त उद्या गुरुवारी महापालिकेला शासकीय सुट्टी आहे. मात्र, महापालिकेच्या कर संकलन विभागाच्या वतीने नागरिकांच्या सोयीसाठी सर्व कर संकलन कार्यालये सुरुच ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी शेवटचे दोन दिवस बाकी असून आपल्या चालू वर्षाचा आणि थकीत कर भरावा, असे आवाहन कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.**






पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी 30 जूनपर्यंत संपूर्ण कराचा भरणा केल्यास किमान दहा टक्के व कमाल 20 टक्के सवलत मिळत आहे. त्यानुसार आत्तापर्यंत 2 लाख 69 हजार 662 मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा करून विविध कर सवलतींचा लाभ घेतला आहे. महापालिका तिजोरीत तब्बल 370 कोटी रुपये जमा झाले आहेत.

सन 2023-24 या आर्थिक वर्षांतील मिळकतकरांची बिले सिध्दी प्रकल्पा अंतर्गत बचत गटाच्या महिलांच्या माध्यमातून घरोघरी 100 टक्के वाटप केली आहेत. याचा कर वसूलीतून मोठा फायदा झाला असल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी म्हटले आहे. शहरातील मालमत्ता धारकांना कर भरण्यासाठी 17 विभागीय कार्यालये आणि ऑनलाईनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तर विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी 30 जूनची मुदत आहे. नागरिक संबंधित कर संकलन कार्यालयात बिले भरण्यासाठी गर्दी करीत आहेत. गुरुवारी महापालिकेला सुट्टी असली तरी कर संकलनची सर्व कार्यालये सुरुच ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

> “ विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी शेवटचे दोन दिवस बाकी आहेत. त्यामुळे नागरिकांच्या सोयीसाठी सुट्टीच्या दिवशी कर संकलनची सर्व कार्यालये सुरुच राहणार आहेत. तसेच शहरातील कोणत्याही भागातील मालमत्ता धारकांना कोणत्याही विभागीय कार्यालयात कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.
>
> – **शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका




# ‘प्रधानमंत्री आवास’ लाभार्थींच्या हक्कासाठी आमदार लांडगें मैदानात!

## » महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना मागणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**“सर्वांसाठी घरे” या संकल्पनेतून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी “प्रधानमंत्री आवास योजना” देशभरात प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे योजनेबाबत शहरवासीयांमध्ये नकारात्मक संदेश जात आहे. त्यामुळे  प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना घराचा ताबा तात्काळ द्यावा, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत महापालिका प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत चऱ्होली आणि बोऱ्हाडेवाडी येथे प्रकल्पाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. प्रशासनाने लाभार्थी निश्चित केले आहेत. त्यांचे कर्ज मंजूर झाले आहे. अनामत रक्कम लाभार्थींनी भरलेली आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थींना सदनिकांचा ताबा मिळणे अपेक्षीत होते. मात्र, काही तांत्रिक अडचणी आणि काहीअंशी अपूर्ण कामामुळे सदनिकांचा ताबा दिला जात नाही. त्यामुळे लाभार्थींमध्ये प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजीचा सूर आहे. \\

त्यामुळे चऱ्होली आणि बोऱ्हाडेवाडी येथील प्रकल्पाचे काम पाहणारे प्रधानमंत्री आवास योजनेचे संबंधित अधिकारी, लाथार्थींचे शिष्टमंडळ यांच्याशी माझ्या समक्ष बैठक घेण्याचे नियोजन करावे. या बैठकीला महापालिकेचा संबंधित जबाबदार अधिकारी उपस्थित असावा, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.

### » माझ्या समक्ष बैठक घ्या अन् सदनिकांचा ताबा तात्काळ द्या!

> “ ‘प्रधानमंत्री आवास’ योजनेतील संबंधित लाभार्थी आणि अधिकारी यांची संयुक्त बैठक घेवून लाभार्थींना तातडीने सदनिकांचा ताबा देण्याबाबत आश्वस्त करण्याची आवश्यकता आहे. कारण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तळागाळातील नागरिकांसाठी सुरू केलेल्या योजनेबाबत नकारात्मक वातावरण निर्माण होवू नये, अशी अपेक्षा आहे. गोरगरीब नागरिकांच्या हक्काच्या घरांचा ताबा निर्धारित वेळेत मिळावा आणि प्रशासनाबाबत नकारात्मक वातावरण निर्माण होवू नये, यासाठी प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी, अशी सूचना केली आहे.
>
> – **महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड



# पुण्यातील समाविष्ट गावांची सांडपाणी समस्या सुटणार!

## » महापालिकेचा आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळाबरोबर करार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये सांडपाणी वहन यंत्रणा उभारण्यासाठी महापालिकेकडून कर्ज घेण्यात येणार आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळाबरोबर (आयएफसी) करार करण्यात आला आहे. त्यानुसार समाविष्ट गावात सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांची उभारणी करण्यात येणार आहे.**



महापालिका हद्दीमध्ये ऑक्टोबर २०१७ आणि जून २०२१ मध्ये टप्प्याटप्प्याने एकूण ३४ गावांचा समावेश करण्यात आला. ऑक्टोबर २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या गावांसाठी महापालिका प्रशासनाकडून ४२३ कोटींचा सांडपाणी आराखडा करण्यात आला आहे. समाविष्ट गावांतील सांडपाणी वहन व्यवस्थेसाठी कर्ज उभारणी करण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या अंदाजपत्रकातही नमूद करण्यात आले होते. त्यादृष्टीने महापालिकेने आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळाबरोबर करार केला आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळाकडून सांडपाणी शुद्धीकरण केंद्रांचा अभ्यास करून आराखडा करण्यात येणार असून समाविष्ट गावातील सांडपाणी शुद्धीकरण केंद्रांची संख्या वाढणार आहे.

शहरातील नदीपात्रात येणारे सांडपाणी रोखण्यासाठी महापालिकेने यापूर्वीच जायका प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पानुसार शहरात नव्याने अकरा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांची उभारणी करणे नियोजित आहे. या प्रकल्पाचा समावेश राष्ट्रीय नदी सुधार योजनेअंतर्गत करण्यात आला असून केंद्र सरकारने त्यासाठी जपान स्थित जायका कंपनीबरोबर करार केला आहे. जायका कंपनीकडून केंद्र सरकारला ९८० कोटींचे कर्ज मिळणार असून ते महापालिकेला अनुदान स्वरूपात दिले जाणार आहे. सध्या या प्रकल्पाची कामे हाती घेण्यात आली आहेत. समाविष्ट गावांमध्ये सांडपाणी वहन व्यवस्था नाही. या गावांना ही सुविधा पुरविण्यासाठी महापालिका सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारणार आहे. या करारानुसार आंतराराष्ट्रीय वित्तीय महामंडळ १ हजार कोटींच्या प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून काम करणार आहे. महामंडळाकडून या प्रकल्पाचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. दीर्घ मुदतीचे कर्ज कसे घ्यावे आणि त्यासाठी व्याजदर किती असावा, याबाबत महापालिकेला मार्गदर्शन केले जाणार आहे. समाविष्ट गावातील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांसाठी पहिल्या टप्प्यात किमान ३०० कोटींचे कर्ज घेतले जाण्याची शक्यता आहे.

### सांडपाणी वहन व्यवस्था सुधारणार का?

**»महापालिका प्रशासनाने यापूर्वी समान पाणीपुरठा योजनेसाठी काही वर्षांपूर्वी दोनशे कोटींचे कर्ज रोखे घेतले होते. त्यानंतर या योजनेसाठी पुन्हा कर्जासाठी महापालिका प्रशासनाकडून हालचाली सुरू झाल्या होत्या. आता सांडपाणी वहन व्यवस्थेसाठी महापालिका कर्ज घेणार आहे. मात्र त्यानंतरही समाविष्ट गावांमधील सांडपाणी वहन व्यवस्था सुधारणार का, हा प्रश्न मात्र कायम राहणार आहे.**

---

# पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी, चांदणी चौकातील वाहतूक या काळात बंद राहणार!

## » गर्डर उभारण्यासाठी चांदणी चौकातील वाहतूकीत बदल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याच्या चांदणी चौकातील वाहतूक ही काही काळासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी पर्यायी सेवा रस्त्याचा वापर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे.**



चांदणी चौक प्रकल्पाच्या मुख्य पुलाच्या (व्हीओपी) गर्डर उभारणीसाठी पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक. ४८ वर ४ ते १५ जुलै दरम्यान मध्यरात्री साडेबारा ते पहाटे साडेतीनपर्यंत मुख्य रस्त्यावरील वाहतूक सेवा रस्त्यावर वळविण्यात येणार आहे. तर, मल्टी ॲक्सेल वाहनांसाठी तीन तास वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी पर्यायी सेवा रस्त्याचा वापर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे.

चांदणी चौकातील पुलाच्या कामाच्या अनुषंगाने वाहतूक वळविण्याबाबत जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अंकित गोयल, पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त विजयकुमार मगर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (एनएचएआय) प्रकल्प संचालक संजय कदम, पिंपरी चिंचवडचे सहायक आयुक्त वाहतूक विठ्ठल कुबडे आदी उपस्थित होते.

---

# पुणेकरांसाठी खुशखबर..!

## पहिल्याच पावसात धरणांच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ

। पुणे । महाईन्यूज ।

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रात तीन दिवसांपासून पाऊस कायम राहिल्याने पाणीसाठ्यात किंचित वाढ झाली आहे. पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला या चारही धरणांत मंगळवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत ४.२५ अब्ज घनफूट (टीएमसी) एवढा पाणीसाठा जमा झाला.

गेल्या वर्षीच पाणीसाठा २.७६ अब्ज घनफूट एवढा होता. दरम्यान, मंगळवारी सायंकाळी पाचपर्यंत वरसगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सर्वाधिक ५८ मिलिमीटर पावसाची नोंद जलसंपदा विभागाकडून करण्यात आली. राज्यासह जिल्ह्यात सर्वदूर मॉन्सून सक्रिय झाला आहे. खडकवासला धरण साखळी प्रकल्पातही गेल्या तीन दिवसांपासून पाऊस सुरू झाला आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या चारही धरणांत सोमवारी सायंकाळी पाचपर्यंत ४.१६ अब्ज घनफूट एवढा पाणीसाठा जमा झाला होता. त्यामध्ये गेल्या चोवीस तासांत किंचित वाढ झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत १.५० अब्ज घनफूट एवढा जास्त पाणीसाठा आहे.

पावसाचे प्रमाण लक्षात घेता धरणातील पाणीसाठ्यात वाढ होण्याची शक्यता आहे. मंगळवारी दिवसभरात खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात १४ मिलिमीटर, पानशेत धरण परिसरात ५५ मिमी, वरसगाव आणि टेमघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अनुक्रमे ५८ आणि ३० मिमी पावसाची नोंद जलसंपदा विभागाकडून करण्यात आली.

# पुण्याचा युपी, बिहार होतोय काय?

## »नगरसेवकाच्या हत्येचा कट : खंडणी विरोधी पथकाकडून तीघे गजाआड

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**किशोर आवारे यांच्या खुनाचा बदला घेण्याच्या तयारीत असलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या दरोडा विरोधी पथकाने चार पिस्तुलासह अटक केली. त्यानंतर लगेचच पुनावळे येथील राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक शेखर ओव्हाळ यांच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी आणखी तिघांना खंडणी विरोधी पथकाने जेरबंद केले आहे.**

काही दिवसांपूर्वी तळेगाव येथे किशोर आवारे हत्या प्रकरण राज्यभरात गाजले. काल पुण्यात एका विद्यार्थीनीवर कोयत्याने हल्ला केल्याची घटना समोर आली. भरदिवसा वाहनांची तोडफोड, फायरिंग, कोयता गँगचा धुमाकूळ... अशा घटनांमुळे सुसंस्कृत पुणे-पिंपरी-चिंचवड आता युपी, बिहार होते आहे का? असा सवाल सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित केला आहे.

माजी नगरसेवक ओव्हाळ यांच्या हत्येचा कट करणाऱ्यांकडून पिस्तूल व जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहे. या दोन्ही कारवाया करणाऱ्या पथकांचे वरिष्ठांकडून कौतुक केले जात आहे. किशोर बापू भोसले (३१, रा. पुनावळे), अमित दत्तात्रय पाटुळे वय (२३ रा. शिंदेवस्ती चौक, रावेत), अमोल उर्फ धनज्या गजानन गोरगले (३४, रा. पुनावळे गावठाण), अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, पथकातील पोलीस नाईक आशिष बोटके आणि प्रदीप गोडांबे यांना बातमी मिळाली की, सराईत गुन्हेगार किशोर भोसले व अमित पाटुळे हे कोणतातरी गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने पुनावळे येथील स्मशानभुमी येथे येणार असून त्यांचेकडे पिस्तूल आहे. त्यानुसार, त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १ देशी बनावटीचे पिस्तुल आणि २ जिवंत काडतुसे (राऊंड) जप्त करण्यात आली.

दरम्यान, त्यांनी पिस्तुल आरोपी गोरगले याचे सांगणेवरून आरोपी रविराज उर्फ कन्नड्या राजेंद्र केदार याचेकडून आणले असल्याचे सांगितले. त्यानुसार, आरोपी गोरगले यास अटक केली. दोन दिवसांपूर्वी दरोडा विरोधी पथकाने प्रमोद सोपान सांडभोर (३३, रा. हरणेश्वर वाडी, तळेगाव दाभाडे) आणि शरद मुरलीधर साळवे (३०, रा. धनगर बाबा मंदिराच्या मागे काळेवाडी), यांना चार पिस्तुलांसह अटक केली आहे.

आरोपी दिवंगत किशोर आवारे यांचे निकटवर्ती असल्याने ते देखील हत्येचा बदला घेण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे.

शेखर ओव्हाळ यांची पाच एकर जमीन नुकतीच डेव्हलपमेंटसाठी बिल्डरला देण्यात आली आहे. तिथल्या माथाडीच्या कामावरून शेखर ओव्हाळ आणि अमोल गारगले



यांच्यात वाद झाले होते. माथाडीचे हे काम हातातून गेल्यानंतर पुन्हा आपल्याला काम मिळणार नाही. या उद्देशाने शेखर ओव्हाळ यांची हत्या करण्याचा प्लॅन अमोल गारगले याने केला. सोलापूर मंगळवेढा येथून तडीपार गुंड रविराज केदारी याच्याकडून पिस्तूल आणि दोन जिवंत काढतुसे आणली. पुढील दोन – तीन दिवसांमध्ये ओव्हाळ यांची हत्या करण्याचा प्लॅन झाला. त्या अगोदरच खंडणी विरोधी पथकाने संबंधित आरोपींच्या मुस्क्या आवळत हत्येचा कट उधळून लावला आहे.

### माथाडीच्या कारणावरुन वाद...

**»आरोपींकडे पिस्तूल आणण्याचा उद्देश विचारले असता, त्यांनी राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक यांच्याशी माथाडीच्या कारणावरून वाद झाला होता. त्यामुळे त्यांची हत्या करण्यासाठी पिस्तूल आणल्याची कबुली दिली. आरोपींनी दिलेल्या कबुलीमुळे राजकीय आणि पोलिस वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.**

# संभाजी भिडे गुरूजी यांनी केली 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'च्या जागेची पाहणी

## »आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्रालाही संभाजी महाराजांचे नाव?

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका आणि शिव-शंभू प्रेमींच्या पुढाकाराने मोशी येथील औद्योगिक प्रदर्शन केंद्राच्या जागेत जगातील सर्वात उंच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज पुतळा 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' उभारण्यात येत आहे. शिवप्रतिष्ठान हिंदूस्थानचे संस्थापक संभाजी भिडे गुरूजी यांनी या जागेची पाहणी केली.**



भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' चे काम हाती घेण्यात आले आहे. हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांचा तब्बल १४० फूट उंच पुतळा उभारण्यात येणार आहे. पुतळ्याचे काम दिल्ली येथील कार्यशाळेत सुरू आहे.

यापूर्वी, ज्या जागेत हा पुतळा उभारण्यात येत होता. ती जागा दोन इमारतींच्या मध्ये असल्यामुळे अपुरी होती. त्यामुळे प्रशस्त जागेत पुतळा आणि शंभू सृष्टी उभारण्यात यावी, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लावून धरली होती. त्याला यश मिळाले आणि 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील अडीच एकर जागा 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'साठी देण्याचे निश्चित करण्यात आले. जागेचे महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरणही करण्यात आले आहे.

दरम्यान, संभाजी भिडे यांनी प्रस्तावित शंभूसृष्टीच्या जागेची पाहणी करण्याची इच्छा पिंपरी-चिंचवडमध्ये व्याख्यानाच्या निमित्ताने आले असता केली होती. यावेळी आमदार महेश लांडगे, पुणे जिल्हा परिषद बांधकाम समितीचे माजी सभापती मंगलदास बांदल, माजी स्वीकृत नगरसदस्य सागर हिंगणे, संतोष लांडगे, अमित जावळे, गणेश भुजबळ, सतिश लांडगे, मोशीतील ग्रामस्थ आणि शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी उपस्थित होते.

### »भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

“ हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांचा जगातील सर्वात उंच पूर्णाकृती पुतळा मोशी येथे साकारत आहे, ही आम्हा पिंपरी-चिंचवडकर आणि शिव-शंभूप्रेमींसाठी अभिमानाची बाब आहे. शूभराजांच्या दैदिप्यमान इतिहासाची जाज्वल्य यशोगाथा भावी पिढ्यांना समजावी आणि शिव-शंभू विचार घराघरांमध्ये रुजावा, या करिता हा 'स्टॅच्यु ऑफ हिंदूभूषण' उभारला जात आहे. नवीन जागेत उभारण्यात येणाऱ्या या प्रेरणास्थळाला श्री शिवप्रतिष्ठान हिंदूस्थानचे संस्थापक गुरूवर्य श्री. भिडे गुरूजी यांनी भेट दिली. “आपल्या राजाच्या कार्याची भव्यता जशी होती, तसेच भव्य शंभूसृष्टी या ठिकाणी उभारली जात आहे...” अशी कौतुकाची थाप गुरूजींनी दिली. त्यामुळे हाती घेतलेले कार्य पूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली.

– **महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड

# आपल्या कुटुंबात तरी सगळ्यांशी संवाद होतो ?




**महाविद्यालयात नुकतेच पाऊल ठेवलेली मुले सगळ्याच स्तरातील पालकांसाठी अवघड जागेचे दुखणे ठरू लागली आहेत. बालपणी कळसूत्री बाहुली प्रमाणे वागणारी मुले या वयात पालकांच्या नियंत्रणाच्या बाहेर जायला लागलेली असतात. काहीही मनाच्या विरुद्ध घडले की हिंसक कृत्ये करायला धजावणाऱ्या मुलांनी पालकांनाच भीतीग्रस्त करून ठेवले आहे. श्रीमंत किंवा नोकरदार घरात आईबाप दिवसभर घरात नसतील तर अश्या मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी असलेल्या कुणाचेही अशी मुले ऐकेनाशी झाली आहेत.**

चारपाच जणांच्या मर्यादित कुटुंबातील परस्परातील संवाद कधीच थांबला आहे. सगळ्याच क्षेत्रात स्पर्धा आणि घड्याळाच्या काट्यावर जगणे नियंत्रित झाल्यामुळे प्रत्येकजण आपल्या पद्धतीने जगायला शिकल्याने कुटुंबाचे सामूहिकपण संपल्यात जमा झाले आहे. मुलांना " स्पेस " मिळावी म्हणून स्वतंत्र खोली मिळाली असली तरी त्यांचा एकांत वाढला आहे. त्यातून अनेक प्रश्नांनी तोंड बाहेर काढले आहे.

अलीकडे एक दिवसाआड टीनएजर मुलांच्या हिंसक कारवाया नजरेपुढे येताना दिसतात. महाविद्यालयीन प्रांगणातील हाणामाऱ्यांनी आता थेट हत्यांचे स्वरूप धारण केले आहे. मित्रांच्या थट्टा,मस्करी,गम्मत किंवा खोड्या सहन करण्याची क्षमता मुलांमध्ये राहिली नाही. परवा नागपुरात केवळ गम्मत केल्यामुळे एका मित्राने दुसऱ्याला एवढे बेदम मारले की वर्मावर घाव लागल्याने त्याला प्राणाला मुकावे लागले. हिंसक वृत्ती, एकांतपणा आणि उथळ झालेले स्वभाव मुलांमध्ये एवढे वाढले आहेत की दर दोन मुलान्मधे एक मुलगा जणू बारूदच्या



ढिगाऱ्यावर बसल्याचे जाणवत आहे. शिक्षण आणि करियरच्या स्पर्धा सध्या एवढ्या जीवघेण्या झाल्या आहेत की मुलांना ते सोडून इतर कोणताही छंद जोपासता येईल याची कोणतीही शाश्वती राहिली नाही . त्यामुळे मुलांचे सामाजिकीकरण करणे महत्वाचे झाले आहे , त्यांना कुटुंबात रमवणे आवश्यक झाले आहे.

यात मुलांचा थोडाफार दोष असला तरी त्याची मोठी जबाबदारी पालकांकडे जाते. ज्या कुटुंबात बाहेरून भरपूर पैसा येतो तिथे कोणतीही समस्या पैश्याने सुटू शकते यावर एकमत असते त्यामुळे मुलांनी मागणी केली तेवढा पैसा त्यांच्या हातात दिला की प्रश्न सुटला असे समजले जाते. कदाचित काही समस्या पैश्याने सुटत सुद्धा असतील मात्र सगळ्या समस्यांचे पैसा हे उत्तर असू शकत नाही हे पालकांनी समजून घेण्याची गरज आहे. महाविद्यालयात इतर मुली आणि शिक्षकांशी कसे वागावे यावर कुटुंबात कधी चर्चा झाली नसेल तर अशी मुले टीव्ही मालिका आणि सिनेमातून त्याची उणीव पूर्ण करायला लागतात. पडद्यावर दिसणारे प्रेम आणि ते असफल झाल्यावर कोणती पावले उचलावीत याचेही प्रशिक्षण तिथेच मिळाल्याने मुलांना तेच योग्य वाटते , याबाबत कुटुंबात कुणाशी बोलावे असे नातेच एवढ्या वर्षात निर्माण झालेले नसते हा मोठा अडथळा त्यात निर्माण होतो.

प्रेमाच्या नादात मुलींच्या क्रूरपणे झालेल्या हत्त्या प्रकरणात मोठा भाग मुलांचा असल्याचे दिसते. आवडणाऱ्या मुलीने नकार देताच याचा पुरुषी अहंकार जागा होतो आणि नको ते घडते. कोणत्याही मुलीशी कसे वागले पाहिजे यावर ज्या कुटुंबात चर्चा होतात त्यातून मुलांचे विचार विकसित व्हायला मदत होते. जी वागणूक आपल्या बहिणीशी कुणी केलेली तुला आवडणार नसेल तर तीच वागणूक इतरांना कशी आवडेल? यावर कधीतरी कुटुंबात संवाद झाला नसेल तर वागण्याचा हा वेगळा अँगल मुलांच्या व्यक्तिमत्वात खुलणार नाही , त्यासाठी दररोज नसला तरी एक दिवसाआड मुले आणि पालकात अभ्यासाच्या व्यक्तिरिक्त संवाद व्हायला हवा.

किमान आठवड्यातून एकदा तरी जेवणाच्या वेळी अश्या संवादाची सुरुवात व्हायला हवी तरच त्यातून मुलांच्या डोक्यात काय चाललेय याची कल्पना येऊन त्यावरचे उपाय शोधता येतील. हा संवाद होत नसेल तर तत्काळ सुरु करायला हरकत नाही.

टीनएजर मुलगा किंवा मुलगी यांचा जवळचा मित्र,मैत्रीण आईवडिलांनी होण्याची आजच्या काळात गरज आहे. नाहीतर ही स्पेस ते इतरत्र शोधत असतात आणि बाहेरून त्यांच्या हिताचा सल्ला मिळेल याची कोणतीही गॅरंटी आताच्या काळात देता येऊ शकणार नाही.

पालकांनी सुद्धा टिपिकल आई किंवा बापाच्या भूमिकेतून काहीकाळ बाहेर येऊन मुलांच्या पातळीवर येऊन विचार करण्याची किंवा त्यांच्या भावना किमान समजून घेण्याची गरज आहे. सतत कानावर येणाऱ्या बातम्यांनी हा पालक भयग्रस्त बनला आहे त्यामुळे त्याच्या संयमाच्या कडेलोट होऊन त्याच्यातील जमदग्नी पालकाचे दर्शन कधीतरी मुलांना होतेआणि तिथूनच दुरावा वाढायला लागतो. मुलांच्या पुढे झुकणे म्हणजे आपला पराभव असल्याचा मोठा गैरसमज आधी डोक्यातून काढावा लागेल तो निघाला की मुलांच्या भावना,अडचणी समजणे अधिक सोपे व्हायला मदत होते.

## संपादकीय »

### पाटण्यातील 'प्रयोग'

***भारतातले विरोधक निवडणुकांची चाहूल लागली की खडबडून जागे होतात, ऐक्याच्या आणाभाका घेतात, गळ्यात गळे घालतात आणि एकमेकांच्या विरोधात तोडलेले तारे विसरून हसरी सामूहिक छायाचित्रे काढून घेतात .***

पूर्वी काँग्रेस सत्तेवर असताना या शंभुमेळ्यात भारतीय जनता पक्षही असे. आता फक्त खेळगडी बदलले; खेळ जुनाच आहे. बिहारचे मुख्यमंत्री आणि विरोधकांचे सांप्रतचे तारणहार नितीशकुमार यांनी गुडघ्याला अदृश्य बाशिंग बांधले आहे; त्याला दोन दशके झाली. मात्र, 'सिंहासन' चित्रपटातील 'देवा, सत्यनारायणा, आम्हाला एक दिवस तरी मुख्यमंत्री कराच...' असे गुपचूप म्हणणाऱ्या मंत्र्याप्रमाणे 'एक दिवस या देशाचा पंतप्रधान होईनच...' असे मनातल्या मनात रोज म्हणणारे आणि त्यासाठी झुरणारे डझनभर नेते तेथे आहेत. या सांगोवांगीच्या कथा नाहीत. आणीबाणीनंतर सन १९७७ ते १९८०, त्यानंतर १९८९ ते १९९१ आणि पुढे १९९६ ते १९९९ अशा तीन खेपांमध्ये भारताने अल्पकाळ टिकलेले सात पंतप्रधान पाहिले. ही सगळी सरकारे का पडली?

**तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव विठ्ठलाच्या चरणी लीन. याआधी कधी विठ्ठलचरणी इतक्या लव्याजम्यासह लीन झाले नव्हते. तेव्हा त्यांचे नेमके मनोरथ काय आहेत आणि विठोबाला त्यांनी काय मागितले असेल, याचा अंदाज करणे कठीण नाही.**

## हैदराबाद ते पंढरी

आषाढी एकादशी उद्या आहे. तेव्हा पंढरपुरात भक्तांचा पूर लोटेल. त्यात केवळ मराठी भक्त नसतील. साऱ्या दक्षिण भारतातून तसेच इतरही राज्यांमधून भक्त विठ्ठलाच्या चरणी लीन होतील. मात्र, हैदराबादहून शेकडो आलिशान गाड्यांचे नेतृत्व करीत एक भक्त पंढरीत आधीच दाखल झाला आणि त्याने विठ्ठलाची मनोभावे पूजा केल्यानंतर 'मनोरथा: सफला: सन्तु' असा भरघोस आशीर्वाद तेथील पुजारी मंडळींकडून संपादन केला. तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव म्हणजेच केसीआर याआधी कधी विठ्ठलचरणी इतक्या लव्याजम्यासह लीन झाले नव्हते. तेव्हा त्यांचे नेमके मनोरथ काय आहेत आणि विठोबाला त्यांनी काय मागितले असेल, याचा अंदाज करणे कठीण नाही. केसीआर यांनी गेल्या काही महिन्यांत महाराष्ट्राचे केवळ दौरेच केले नाहीत तर जातील तिथे 'गुलाबी रंगाची' मनसोक्त उधळण केली आहे. गुलाबी हा त्यांच्या पक्षाचा, झेंड्याचा रंगच आहे. एकीकडे, महाराष्ट्रातले राष्ट्रीय पक्ष प्रादेशिक होत असताना केसीआर यांची झेप आणि महत्त्वाकांक्षा वाखाणण्याजोगी आहे. त्यांनी आपल्या कर्तबगारीने आणि स्वत:चे प्राण पणाला लावून भारताच्या नकाशावर एक स्वतंत्र राज्य कोरून दाखविले आहे. त्यांना एक ना एक दिवस देशाचा पंतप्रधान व्हायचे आहे. आपण पंतप्रधान झालोच तर राज्यात सिंहासन सांभाळण्यासाठी त्यांनी कॅबिनेट मंत्री केलेला मुलगा केटीआर आणि सध्या



सक्तवसुली संचालनालयाची वक्र दृष्टी पडलेली मुलगी कविता यांनाही त्यांनी राजकारणात तयार केले आहे. केसीआर आता दर काही आठवड्यांनी महाराष्ट्रात येत राहतील आणि त्यांच्या गळाला विविध पक्षांतील बरेच असंतुष्ट लागत राहतील. कोणत्याही राज्यातल्या प्रादेशिक पक्षाने आजवर महाराष्ट्रावर असे लक्ष केंद्रित केले नव्हते. याला निरनिराळे कोन आहेत. एकतर तेलंगण हा मराठवाडा आणि विदर्भ यांना लागून असणारा प्रांत आहे. या भागांचे जुने सांस्कृतिक नाते आहे. स्वातंत्र्य मिळण्याआधी व नंतरही मराठवाडा आणि हैदराबाद स्टेट यांचे जवळचे नाते राहिले. दुसरे म्हणजे, केसीआर हे स्वत:ला प्रामुख्याने शेतकऱ्यांचे तारणहार म्हणून प्रस्थापित करीत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पावसाने दाणादाण; मुंबई तुंबली!

## कुठे घरांची पडझड तर कुठे वाहनांचे नुकसान

। मुंबई/ठाणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



**मुंबई उपनगरांसह ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर पालघर आदी भागांत बुधवारी पावसाने दिवसभर दाणादाण उडवल्याचे चित्र पाहायला मिळाले. पावसामुळे पाणी साचू नये, यासाठी मुंबई महापालिकेने केलेल्या जय्यत तयारीचा दावा बुधवारीही फोल ठरला.**

मुंबई उपनगरांसह ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर पालघर आदी भागांत बुधवारी पावसाने दिवसभर दाणादाण उडवल्याचे चित्र पाहायला मिळाले. पावसामुळे पाणी साचू नये, यासाठी मुंबई महापालिकेने केलेल्या जय्यत तयारीचा दावा बुधवारीही फोल ठरला. सकाळपासून पडलेल्या मुसळधार पावसामुळे सखल भागांत पाणी तुंबले होते. काही भागांतील रस्तेही जलमय झाले. तर नाले, गटारेही तुंबली. मुंबईतील शहरी भागांपेक्षा उपनगरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साठले होते. मुंबईत सहा ठिकाणी घरांचा काही भाग पडण्याच्या घटना घडल्या.

ठाणे जिल्ह्यातही पावसामुळे या भागातील अनेक रस्ते जलमय झाले होते. त्यामुळे शहरातील अंतर्गत रस्ते व महामार्गावरील वाहतूक मंदावली होती. यासोबतच शहरात विविध ठिकाणी झालेल्या पडझडीत वाहनांचे व घरांचे मोठे नुकसान झाले. विविध २० ठिकाणी पाणी तुंबले होते. मुंब्रा बायपासवर सलग दुसऱ्या दिवशी दरड कोसळली.

डोंबिवलीतील मानपाडा पोलीस ठाण्यात पाणी साचल्याने पोलीस प्रशासनाची त्रेधातिरपीट उडाली. तर पालघर जिल्ह्यातील सूर्या नदीला पूर आला असून, मासवण येथे असलेला जुना पूल. सायंकाळी पाण्याखाली गेला आहे.

### मुंबईत दहा टक्के पाणीकपात

मुंबईत पावसाचे उशिराने झालेले आगमन आणि धरणक्षेत्राकडे पावसाने फिरवलेली पाठ यामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा शिल्लक नाही. परिणामी, शनिवार, १ जुलैपासून मुंबईत १० टक्के पाणीकपात करण्यात येणार आहे. मुंबई महापालिकेकडून ठाणे, भिवंडी-निजामपूर महापालिका आणि इतर गावांना करण्यात येणाऱ्या पुरवठ्यातही ही १० टक्के कपात लागू राहील, असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

---

## पंढरपुरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सपत्नीक विठ्ठलाची शासकीय महापूजा; काळे दाम्पत्य मानाचे वारकरी



।पंढरपूर।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

आषाढी एकादशीनिमित्त आज राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्निक आणि मानाचे वारकरी भाऊसाहेब मोहिनीराज काळे (वय ५६) व त्यांच्या पत्नी मंगल भाऊसाहेब काळे (वय ५२) यांच्या हस्ते विठ्ठलाची शासकीय महापूजा पहाटे २.५७ मिनिटांनी विठ्ठल मंदिराच्या गाभाऱ्यात पार पडली. विठ्ठल-रुक्मिणीच्या भक्तीत तल्लीन होऊन हजारो किलोमीटरचा पायी प्रवास करून पंढरपुरात आलेल्या लाखो वारकऱ्यांनी चंद्रभागेच्या तीरावर आषाढी एकादशीच्या पहाटे विठुनामाचा गजर सुरू केला.

शासकीय महापूजेवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत त्यांच्या परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते. याशिवाय ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री सुरेश खाडे, सोलापूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आरोग्यमंत्री तानाजी सावंत, कृषिमंत्री दादा भुसे, खा. श्रीकांत शिंदे, मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख मंगेश चिवटे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा परिषदेचे सीइओ दिलीप स्वामी, देवस्थान समितीचे सह अध्यक्ष गहिणीनाथ महाराज औसेकर महाराज यांच्यासह जिल्ह्यातील खासदार, आमदार आणि अन्य लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

---

# तर प्राण्यांच्या बेकायदा कत्तली रोखा

## उच्च न्यायालयाचा महापालिका, मुंबई पोलिसांना आदेश

। शिराळा ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यात बकरी ईद असल्याने अनेक ठिकाणी जनावरांची कत्तल होणार आहे. पण मुंबईतील एक कत्तल प्रकरण थेट उच्च न्यायालयात गेलं. या प्रकरणी रात्री उशिरा उच्च न्यायालयाने सुनावणी घेत निर्णय दिला.बकरी ईदनिमित्त मुंबई सेंट्रल येथील लॅमिंग्टन रोडवरील नथानी हाईट्स या इमारतीत बेकायदा पद्धतीने प्राण्यांची कत्तल केली जाणार असल्याची तक्रार करत काही रहिवाशांनी बुधवारी संध्याकाळी उशिरा मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. यानंतर न्यायालयाने त्याची गंभीर दखल घेतली.**

‘या इमारतीत बेकायदा कत्तल होणार नाही, याची खबरदारी महापालिकेने घ्यावी. संबंधितांनी महापालिकेकडून कायद्याप्रमाणे परवाना मिळवलेला नसेल तर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने कत्तलीचे प्रकार रोखावेत. पोलिस आयुक्त किंवा नागपाडा पोलिस प्रमुखांनी पोलिस बळ पुरवावे’, असा आदेश न्या. गिरीश कुलकर्णी व न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने रात्री सव्वा आठच्या सुमारास दिला.

हरेश जैन व अन्य काहींनी ॲड. सुभाष झा यांच्यामार्फत संध्याकाळी रिट याचिका केल्यानंतर खंडपीठाने रात्री याप्रश्नी तातडीची सुनावणी घेतली. या सुनावणीत ॲड. जोएल कार्लोस यांनी पालिकेची बाजू मांडली. ‘मंगळवारी सकाळी काहींनी प्राण्यांना इमारतीत आणून बांधल्याचे दिसले. त्यांनी व्हॉट्सॲप ग्रुपवर रहिवाशांची संमती मिळवली.

कायद्याप्रमाणे पालिकेचा परवाना मिळवून विशिष्ट ठिकाणीच प्राण्यांची कत्तल करण्यास अनुमती असताना सोसायटीमध्येच कत्तल करण्याचा घाट घालण्यात आला. सोसायटीत अनेक लहान मुलेही असल्याने याचा त्यांच्या मनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आधी पोलिसांकडे व नंतर पालिकेकडे तक्रारी केल्या. परंतु, केवळ तोंडी आश्वासने मिळाली. बुधवारी सकाळी काही प्राणी आणण्यात आले. म्हणून नाईलाजास्तव तातडीची याचिका करावी लागली’, असे म्हणणे याचिकाकर्त्यांतर्फे खंडपीठासमोर मांडण्यात आले.



### हानिकारक प्रथांना प्रतिबंध करणे आवश्यक

**या याचिकेवर एक सदस्यीय खंडपीठाचे न्यायमूर्ती वही. जी. अरुण यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायमूर्ती वही. जी. अरुण यांनी स्पष्ट केले की, “भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मतानुसार, खऱ्या धार्मिक प्रथेला परंपरेचे आंधळे पालन न करता तर्क, समता आणि मानवतावादी मूल्यांनी मार्गदर्शन केले पाहिजे. सर्व अहितकारक, अशास्त्रीय आणि समाजासाठी हानिकारक प्रथांना प्रतिबंध करणे आवश्यक आहे. धार्मिक प्रथेच्या नावाखाली केले जाणारी पशुबळी ही अशीच एक प्रथा असून याला आळा घालण्याची गरज आहे.”**



# कंगनाचा सूर पुन्हा एकदा बदलला

अभिनेत्री कंगना राणावतने निर्विकारपणे आपले मत व्यक्त केले. कंगना अनेकवेळा फिल्म इंडस्ट्रीवर टीका करताना दिसली आहे. अलीकडेच कंगनाने ट्विटरवर पुनरागमन केले आहे, त्यानंतर तिने शाहरुख खानच्या पठाण चित्रपटाबाबत अनेक ट्विट केले आहेत. कालपर्यंत 'पठाण'चे गुणगान करणाऱ्या कंगनाचा सूर पुन्हा एकदा बदलला आहे. आता कंगनाने पठाणला फक्त एक चित्रपट सांगितला आहे आणि येथे फक्त जय श्री रामाचाच जयजयकार होणार असल्याचे सांगितले आहे.

कंगनाने एकामागून एक 3 ट्विट केले आहेत. कंगना म्हणाली- पठाण द्वेषावर प्रेमाचा विजय असल्याचा दावा करणाऱ्यांशी मी सहमत आहे, पण ज्यांचे प्रेम आणि कोणाचा द्वेष. तिकीट कोण खरेदी करत आहे आणि कोण यशस्वी करत आहे हे नीट समजून घेऊया. होय, हे भारताचे प्रेम आहे, जिथे 80 टक्के हिंदू राहतात आणि तरीही चित्रपटाचे नाव पठाण आहे आणि तो यशस्वी होत आहे.

कंगनाने पुढे लिहिले- 'पण जे आशा बाळगून आहेत, त्यांनी लक्षात ठेवा की पठाण हा फक्त एक चित्रपट आहे. येथे फक्त जय श्री रामच गुंजेल. कंगनाने आणखी एका ट्विटमध्ये लिहिले- 'माझा विश्वास आहे की भारतीय मुस्लिम देशभक्त आहेत आणि अफगाण पठाणांपेक्षा खूप वेगळे आहेत... सार हा आहे की भारत कधीच अफगाणिस्तान होणार नाही, अफगाणिस्तानमध्ये काय चालले आहे ते आपल्या सर्वांना माहीत आहे. तिथली परिस्थिती नरकाच्या पलीकडे आहे. 'पठाण' हे चित्रपटाचे योग्य नाव आहे. तो भारतीय पठाण आहे.

नुकतेच अभिनेत्री कंगना राणावतने तिच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या रॅप-अप पार्टीदरम्यान 'पठाण' चित्रपटाचे कौतुक केले होते. कंगना म्हणाली होती- 'पठाण चांगली कामगिरी करत आहे. असे चित्रपट चालले पाहिजेत. मला वाटते की प्रत्येकजण आपापल्या स्तरावर कठोर परिश्रम करत आहे ' विशेष म्हणजे, कंगना लवकरच इमर्जन्सी आणि तेजस या चित्रपटांमध्ये दिसणार आहे.

# "मला बायकोचा सतत राग येतो, काय करू?"



मराठी सिनेसृष्टीतील आघाडीचा अभिनेता म्हणून जितेंद्र जोशीला ओळखले जाते. त्याच्या दमदार अभिनय कौशल्यामुळे तो कायमच चर्चेत असतो. मराठीप्रमाणेच हिंदी कलाविश्वातही त्याने अढळ स्थान निर्माण केले आहे. यामुळेच त्याचा फार मोठा चाहतावर्ग आहे. नुकतंच जितेंद्र जोशीने त्याच्या चाहत्याला चांगला सल्ला दिला आहे.

जितेंद्र जोशीने नुकतंच इन्स्टाग्रामवर एक सेशन आयोजित केले होतं. "प्रवास करताना गप्पा मारुया", अशी पोस्ट त्याने इन्स्टाग्रामवर केली होती. त्यावर त्याच्या अनेक चाहत्यांनी त्याला प्रश्न विचारले. त्याची जितेंद्र जोशीने मजेशीररित्या उत्तर दिली.

"तो तिच्यावर कोयत्याने वार करणार तेवढ्यात...", पुण्यातील कोयता हल्ल्यातून तरुणीला वाचवणाऱ्या तरुणांनी सांगितला घटनाक्रम!

यावेळी एका चाहत्याने जितेंद्र जोशीला अजब प्रश्न विचारला. "मला बायकोचा सारखा राग राग येतो काय करु?", असा प्रश्न एकाने जितेंद्र जोशीला विचारला. त्यावर जितेंद्र जोशीने त्याला उत्तर देत हटके सल्लाही दिला.

"राग जसा येतो, तसा जातो सुद्धा आणि माझ्याशी नाही तिच्याशी बोल. बंद कर मोबाईल", असे उत्तर जितेंद्र जोशीने त्याला दिले आहे.दरम्यान जितेंद्र जोशी हा काही दिवसांपूर्वी 'गोदावरी' या चित्रपटात झळकला होता. या चित्रपटाने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये स्थान मिळवलं होतं. या चित्रपटात जितेंद्र जोशीने प्रमुख भूमिका साकारली होती.

# उर्फीने बिकिनीच्या नावावर घातली विचित्र वस्तू

प्रसिद्ध अभिनेत्री उर्फी जावेद जिच्या एका कटाक्षामागे जग वेडे आणि आश्चर्यचकितही होते. उर्फीने पुन्हा एकदा तसे करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. ती अलीकडेच एका सार्वजनिक ठिकाणी दिसली आणि यावेळी देखील तिने लोकांचे लक्ष तिच्याकडे आकर्षित केले. उर्फी ऑल ब्लॅक लूकमध्ये सुंदर दिसत होती, पण बिकिनी लूकने सगळी लाइमलाइट काढून घेतली. यादरम्यान ती बिकिनीच्या नावाने काहीतरी विचित्र परिधान करून आली आणि आकर्षणाचे केंद्र बनली.



कोणाच्या नजरेत कसं यायचं किंवा लोकांचं लक्ष कसं आकर्षित करायचं हे उर्फी जावेदला चांगलंच माहीत आहे. अलीकडेच ती एका रेस्टॉरंटच्या बाहेर दिसली आणि तिला पाहताच लोकांनी तिचे फोटो काढायला सुरुवात केली. उर्फीने ऑल ब्लॅक लूक घातला होता. तिने काळ्या रंगाचा स्कर्ट घातला होता आणि सोबत काळ्या रंगाची बिकिनी घातली होती. तिचा लुक पूर्ण करण्यासाठी तिने तिचे केस बांधले होते आणि दागिन्यांच्या नावावर फक्त कानातले घातले होते. उर्फीचा हा लूक खूपच वेगळा आहे. आता उर्फीचा नवा लूक समोर आला असून ती ट्रोल होऊ लागली आहे.

या नव्या लूकसाठी लोकांनी उर्फी जावेदला ट्रोल केले आहे. एका यूजरने म्हटले की, तिचा लूक पाहून मला चक्कर येत आहे, तर एकाने लिहिले की, काही लोकांना उर्फीच्या फॅशनचा हेवा वाटतो. उर्फी जावेदने काय परिधान केले आहे, असे अनेक लोक कमेंट बॉक्समध्ये विचारत आहेत. एकाने तर लिहिलं की, तिचा लूक पाहून मला हसू आलं. उर्फीला दरवेळेप्रमाणे ट्रोल केले जात आहे,



## बाबो! 3 मिनिटांच्या आयटम साँगसाठी उर्वशीनं घेतलेली फी ऐकून चक्रावेल डोके..



बॉलिवूडनंतर उर्वशीने आता साउथ सिनेसृष्टीमध्ये पाऊल टाकलं आहे. उर्वशीने कन्नड सिनेमांमध्ये काम केलंय. उर्वशीने चिरंजीवी यांच्या 'वाल्टेयर वीरय्या' या सिनेमातून तामिळ सिनेसृष्टीत पाऊल टाकलंय. खरं तर या सिनेमात ती फक्त एका गाण्यात झळकली आहे. या सिनेमात खलनायकाच्या भूमिकेत असलेल्या अभिनेते प्रकाश राज यांच्याहून जास्त फी उर्वशीने घेतली आहे. ३ मिनिटांच्या या गाण्यासाठी उर्वशीने तब्बल २ कोटी रुपये घेतले आहेत. तर खलनायकाच्या भूमिकेसाठी प्रकाश राज यांची फी ही दीड कोटी इतकी आहे.

# लॉर्ड्सवर मोठा गदारोळ!

## सामना सुरू असतानाच मैदानात घुसले आंदोलक

। लंडन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**अॅशेस २०२३ मालिकेतील दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळ सुरू झाल्यानंतर काही वेळातच आंदोलकांनी मैदानात प्रवेश केला. यानंतर लॉर्ड्सवर बराच गदारोळ झाला. इंग्लंडचा यष्टीरक्षक फलंदाज जॉनी बेअरस्टोने एका आंदोलकाला मैदानाबाहेर नेले.**



इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील अॅशेस मालिकेतील दुसरा सामना सुरू झाला आहे. पहिला सामना अखेरच्या टप्प्यात ऑस्ट्रेलियाने जिंकला. क्रिकेटचा मक्का असलेल्या लॉर्ड्सवर हा सामना खेळवला जात आहे. इंग्लंड संघाचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. सामना सुरू होताच लॉर्ड्सच्या मैदानावर एक वेगळंच दृश्य पाहायला मिळाले. काही आदोलकांनी सामना सुरु झाल्यानंतर भर मैदानात येत गोंधळ घालायला सुरुवात केली. जस्ट स्टॉप ऑइल ग्रुपचे अनेक आंदोलक दुसरे षटक सुरू होण्यापूर्वी मैदानात घुसले.

असे आंदोलक क्रिकेटच्या मैदानात घुसत राहतात. परंतु कधीकधी खेळाडू त्यांच्यापासून दूर राहतात. सुरक्षा कर्मचारी त्यांना पकडून मैदानाबाहेर काढतात. यावेळी काहीतरी वेगळे पाहायला मिळाले. इंग्लंडचा यष्टिरक्षक जॉनी बेअरस्टो एका आंदोलकाला उचलून सरळ मैदानातून बाहेर घेऊन गेला. ज्याचा फोटो चांगलंच व्हायरल होत आहे.

त्यांच्या हातात केशरी रंगाची पावडरही होती. त्याने ती पावडर बेअरस्टोवर फेकली, त्यामुळे त्याचे कपडेही खराब झाले. ते बदलण्यासाठी तो परत ड्रेसिंग रूममध्ये गेला. यामुळे बराच वेळ सामना थांबला होता. तर काहींना सुरक्षा कर्मचाऱ्यांनी मैदानाबाहेर काढले. यादरम्यान डेव्हिड वॉर्नर आणि इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सही आंदोलकांना खेळपट्टीवर जाण्यापासून रोखताना दिसले.

### जस्ट स्टॉप ऑइल ग्रुप नेमकं आहे तरी काय?

जस्ट स्टॉप ऑइल हा यूकेमधील पर्यावरण कार्यकर्ता गट आहे. ब्रिटीश सरकारला नवीन तेल परवाने देण्यापासून रोखणे हे त्यांचे ध्येय आहे. या गटाची स्थापना फेब्रुवारी २०२२ मध्ये झाली आणि एप्रिल २०२२ मध्ये इंग्रजी तेल टर्मिनल्सवर त्यांनी निषेध सुरू झाला. त्यांनी ज्या प्रकारे निषेध केला त्याबद्दल या गटावर टीका केली जात आहे.


भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यादरम्यानही हा गट मैदानात उतरण्याची शक्यता होती. त्या वेळी असे काहीही घडले नाही. पण यावेळी त्यांना संधी मिळाली आणि त्यांनी त्याचा फायदा उचलला.

## ऐतिहासिक मोहालीमध्ये वल्डकपचा एकही सामना नाही!

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

या स्पर्धेच्या यजमान शहरांच्या यादीतून पंजाबच्या मोहालीला वगळणे हा राजकीय हस्तक्षेप असल्याचे क्रीडामंत्र्यांनी सांगितले. पंजाब सरकार हा मुद्दा बीसीसीआयकडे मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक २०२३ (ODI WORLD CUP 2023) चे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ही स्पर्धा ५ ऑक्टोबरपासून सुरू होणार असून ती १९ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. भारतात एकूण १० ठिकाणी ४८ सामने खेळवले जातील. या १० ठिकाणांपैकी पंजाबला यावेळी एकाही सामन्याचे यजमानपद मिळालेले नाही. अशा परिस्थितीत पंजाबचे क्रीडा मंत्री गुरमीत सिंग मीत हेर यांनी मोहालीला आयसीसी क्रिकेट विश्वचषक-२०२३ चे यजमान शहरांच्या यादीतून बाहेर ठेवल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकार आणि बीसीसीआयचा हा निर्णय राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे क्रीडामंत्र्यांनी म्हटले आहे. या स्पर्धेच्या यजमान शहरांच्या यादीतून पंजाबच्या मोहालीला वगळणे हा राजकीय हस्तक्षेप असल्याचे क्रीडामंत्र्यांनी सांगितले.



### मोहालीला एकाही सामन्याचे यजमानपद नाही

पंजाब सरकार हा मुद्दा बीसीसीआयकडे मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंजाबचे क्रीडा मंत्री म्हणाले, "नरेंद्र मोदी स्टेडियम उद्घाटनाचा सामना, अंतिम सामना आणि भारत-पाकिस्तान सामन्याचे देखील आयोजन करत आहे. शेजारच्या धर्मशाला येथे पाच सामन्यांचे आयोजन केले जात आहे, परंतु पंजाबला एकही सामना भरवण्याची संधी मिळालेली नाही. यावरून राजकारण खेळले जात असल्याचे स्पष्ट होते". विशेष म्हणजे २०११ मध्ये मोहालीच्या PCA IS बिंद्रा स्टेडियमवर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना खेळला गेला होता, ज्यामध्ये भारताने पाकिस्तानचा २९ धावांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. उपांत्य फेरीशिवाय, गट टप्प्यातील दोन सामनेही मोहालीत झाले. पण यावेळी मोहालीला क्रिकेट विश्वचषक २०२३ मध्ये एकाही सामन्याचे यजमानपद मिळालेले नाही.

## यंदा भारताकडे वर्ल्डकप येऊ दे रे महाराजा! विराट कोहलीचा शेवटचा विश्वचषक!

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय संघाला त्यांच्या यजमानपदात विश्वविजेते व्हायचे आहे. टीम इंडियाच्या अनेक स्टार खेळाडूंसाठी हा शेवटचा एकदिवसीय विश्वचषक असू शकतो. अशा स्थितीत, संघाला कोणत्याही परिस्थितीत भारतासाठी विजेतेपद मिळवायचे आहे.**

एकदिवसीय विश्वचषक २०२३ चे वेळापत्रक आले आहे. यजमान भारतीय संघ तिसऱ्यांदा विजेतेपद मिळविण्यासाठी मैदानात उतरेल. १९८३ मध्ये कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली भारताने पहिल्यांदा विश्वचषक जिंकला होता. यानंतर भारत २०११ मध्ये श्रीलंकेचा पराभव करून वानखेडे स्टेडियमवर विश्वविजेता ठरला. आता पुन्हा एकदा टीम इंडियाला चॅम्पियन बनण्याची संधी आहे. अनेक मोठ्या भारतीय खेळाडूंसाठी हा शेवटचा एकदिवसीय विश्वचषक असेल असे मानले जात आहे. खरं तर, बहुतेक खेळाडू ३४ पेक्षा अधिक वय असलेले आहेत आणि असे मानले जात आहे की ते पुढच्या विश्वचषकापर्यंत क्वचितच खेळू शकतील.




### कर्णधार रोहित शर्मा

३० एप्रिल १९८७ रोजी जन्मलेला रोहित शर्मा आता ३६ वर्षांचा आहे. भारतीय संघाच्या कर्णधाराच्या फिटनेसवर नेहमीच प्रश्न उपस्थित केले जातात. भारताने विश्वविजेते व्हावे अशी त्याची इच्छा आहे आणि यासह आणखी एक आयसीसी ट्रॉफी त्याच्या कॅबिनेटमध्ये येईल. २००७ मधील टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या संघाचा तो एक भाग होता. २०१९ मध्ये त्याने इंग्लंडमध्ये खूप धावा केल्या होत्या. यावेळीही त्याच्याकडून त्याच दमदार कामगिरीची अपेक्षा असेल.

विराट कोहली

जगातील सर्वात तंदुरुस्त खेळाडूंपैकी एक असलेला विराट कोहली ५ नोव्हेंबरला ३५ वर्षांचा होणार आहे. पुढचा विश्वचषक खेळला जाईल तेव्हा तो ३९ वर्षांचा असेल. कोहली त्याच्या जागी युवा खेळाडूंना संधी देण्याची शक्यता जास्त आहे. कोणाचाही फिटनेस कायम राहत नाही. कोहली तंदुरुस्त राहिला तरी त्याला संघात स्थान मिळते की नाही यावर बरेच काही अवलंबून असेल. भारतात प्रतिभेची कमतरता नाही हे आपणा सर्वांना माहीत आहे.